# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नाशिक विभागीय मंडळ, नाशिक ४२२००३

---

जुलै–ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणा–या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत

## प्रकटन

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत पुनर्परिक्षार्थी, नांवनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणा–या, आय.टी.आय. (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे) Transfer of Credit योजनेव्दारे घेणा–या विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी सदर परीक्षेस प्रविष्ट होवू इच्छिणा–या विद्यार्थ्यांना परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर नियमित शुल्कासह सादर करावयाच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येत आहे त्याचा तसेच विलंबशुल्काच्या कालावधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळांमार्फत पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नांवनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट न झालेले,श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणारे,आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाव्दारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | मंगळवार दि. २८/०६/२०२२ ते गुरुवार, दि.३०/०६/२०२२ | मंगळवार, दि.०५/०७/२०२२ ते | गुरुवार |
| विलंब शुल्क | शुक्रवार, दि.०१/०७/२०२२ ते सोमवार, दि.०४/०७/२०२२ | बुधवार दि.०६/०७/२०२२ | दिनांक ०७/०७/२०२२ |

दिनांक २०/०६/२०२२ ते २७/०६/२०२२ पर्यंत नियमित शुल्काने आवेदनपत्र सादर करावयाच्या तारखा यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या होत्या परंतु विद्यार्थी हित लक्षात घेता आवेदनपत्रे २८/०६/२०२२ ते ३०/०६/२०२२ पर्यंत नियमित शुल्काने व दि. ०१/०७/२०२२ ते दि. ०४/०७/२०२२ पर्यंत विलंबशुल्काने सादर करण्यास मुदत देण्यात येत आहे.

मात्र तदनंतर आवेदनपत्र नियमित शुल्काने सादर करावयाच्या तारखांमधे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही या संदर्भात काही अडचणी असल्यास नाशिक विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

क्रमांक/नाविमं/माध्य ७३/१०४१
दि.२७/०६/२०२२

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव
नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३